# BDC LIBRARY

## New Paper Clipping

## A.Y. 2023-2024

# बाळासाहेब देसाई महाविद्यालयास नॅक पिअर टीमची भेट

▲पाटण, दि. १८ : येथील कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयाला नॅक, बंगलोर या संस्थेने मूल्यांकन करण्यासाठी भेट दिली. या टीमकडून महाविद्यालयाची पाहणी करून महाविद्यालयातील प्रत्येक विभागास भेट देऊन माहिती घेण्यात आली. याप्रसंगी महाविद्यालयीन कामकाजाबाबत नॅक पिअर टीमने समाधान व्यक्त केले. या टीमचे स्वागत कोयना एज्युकेशन सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनी केले.



बाळासाहेब देसाई महाविद्यालयाच्या भेटीप्रसंगी नॅक पिअर टीम. (सुरेश संकपाळ)

नॅक बंगलोर ही महाविद्यालयाचे मूल्यांकन करणारी राष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाची संस्था असून दर पाच वर्षांनी या संस्थेकडून महाविद्यालयाची गुणवत्ता तपासणीचे काम पाहिले जाते. कोयना एज्युकेशन सोसायटीच्या बाळासाहेब देसाई महाविद्यालयात दि. १५ व दि. १६ रोजी मूल्यांकनासाठी या टीमने भेट दिली. या टीमध्ये नॅक पिअर टीमचे चेअरमन डॉ. सैद अखिल अहमद, समन्वयक डॉ. गुलाम मोहमद भट, सदस्य डॉ. गणेशराम सेथूरमण यांचा सहभाग होता. या टीमने महाविद्यालयातील संपूर्ण विभागांची पाहणी करत महाविद्यालयात राबविलेल्या जाणाऱ्या उपक्रमांची माहिती घेतली.

मूल्यांकना दरम्यान महाविद्यालयातील आजी-माजी विद्यार्थी यांच्याशीही या टीमने संवाद साधून त्यांचा अभिप्राय घेतला व दिलखुलास चर्चा केली. महाविद्यालयातील ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत असावी, एम. ए. नंतरचे विविध कोर्सेस सुरू व्हावेत, महाविद्यालयातील क्रीडा विभागासाठी सुविधा उपलब्ध व्हाव्यात आदींबाबत सूचना माजी विद्यार्थ्यांनी करत महाविद्यालयाच्या प्रगतीची माहिती दिली. यावेळी कलाशिक्षक भास्कर काळे, संदीप भोळे, राजेश पोतदार यांनी आपल्या कलाकुंचल्यातून साकारलेली मान्यवरांची चित्रे त्यांना भेट दिली. याबद्दल टीमनेही त्यांचे विशेष कौतुक केले. सातारा येथील कला-वाणिज्य महाविद्यालयाचे प्रा. डॉ. जमीर मोमीन यांनी आभार मानले.

यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, संचालक याज्ञसेन पाटणकर, संचालक संजीव चव्हाण, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पवार आदी उपस्थित होते.